with CGPA 3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# ५३ वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

## ■ निवेदन ■

❖ शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षान्त समारंभ साधारणपणे डिसेंबर, २०१६ /जानेवारी, २०१७ दरम्यान संपन्न होईल.

❖ ऑक्टोबर, २०१५ व एप्रिल, २०१६ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरीता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन आणि खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये विहित नमुन्यासह पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता अर्ज करणे आवश्यक आहे.

१) ३ जुलै, २०१६ ते ३१ ऑगस्ट, २०१६ पर्यंत नियमित शुल्क रू. २५०/-
२) १ सप्टेंबर, २०१६ ते १५ सप्टेंबर, २०१६ पर्यंत विलंब शुल्क रू. ३५०/-
३) १६ सप्टेंबर, २०१६ ते ३१ सप्टेंबर, २०१६ पर्यंत अतिविलंब शुल्क रू. ८५०/-

❖ पदवी प्रमाणपत्र मागणीचा दीक्षान्त अर्ज (Convocation Application) ३ जुलै, २०१६ पासून www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन भरून त्याची प्रिंट घ्यावी व अर्जासोबत आयडेंटीटी साईज एक फोटो व सर्व वर्षाच्या गुणतक्त्याच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात. दीक्षान्त अर्जामध्ये पत्ता पूर्ण आहे याची खात्री करून घ्यावी.

❖ ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झालेले आहेत अशा परीक्षांची यादी विद्यापीठ संकेत स्थळावर ठेवण्यात आलेली आहे. त्या परीक्षांचे पदवी प्रमाणपत्र मागणी अर्ज ऑनलाईन प्रोसेस होतील.

❖ दीक्षान्त अर्ज ऑन लाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG File अपलोड करून नंतरच अर्ज ऑन लाईन भरावा.सदरचा फोटो पदवीप्रमाणपत्रावर Black and White रंगात छपाई होईल.

❖ अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व मोबाईल नंबर नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षान्त समारंभाचे निमंत्रणपत्र व तपशीलवार माहिती विद्यार्थ्यांना ई-मेल/SMS द्वारे कळविण्यात येईल. तथापी ज्या विद्यार्थ्यांचे ई-मेल आयडी उपलब्ध असणार नाहीत तेवढ्याच विद्यार्थ्यांना पोष्टाद्वारे समारंभाचे निमंत्रण पाठविण्यात येईल.

❖ सदर अर्ज उपरोक्त दर्शविलेल्या मुदतीमध्ये विद्यापीठामध्ये समक्ष सादर करावयाचा असल्यास वरील मुदतीप्रमाणेच शुल्क विद्यापीठाच्या लेखा विभागामध्ये रोख जमा करून अर्ज पावतीसह दीक्षान्त विभागामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

❖ अर्ज पोस्टाने अथवा कुरीअरने पाठवावयाचा झाल्यास वरील दर्शविलेल्या मुदतीप्रमाणेच शुल्काचा डिमांड ड्राफ्ट व अर्ज सादर होणे आवश्यक आहे. (डिमांड ड्राफ्ट कोणत्याही राष्ट्रीयकृत/शेडयुल्ड बँकेतून घेतलेला व ''वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर'' यांचे नांवे देय असलेला असावा. डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस विद्यार्थ्याने आपले नांव, पूर्ण पत्ता, परीक्षा व मोबाईल नंबर व अर्जाचा क्रमांक नमूद करावा. ज्यांनी डी. डी. द्वारे फॉर्म भरला आहे, त्यांनी विद्यापीठ कार्यालयात येण्याची आवश्यकता नाही. सदरचे अर्ज पोष्टाद्वारे/कुरीअरद्वारे विद्यापीठास सादर करता येतील. ऑनलाईन पैसे भरण्यासाठी खालील बँकेच्या खात्यावर पेंमेट गेट-वे सुविधा दि.१५ जुलै, २०१६ पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.नं | बँकेचे नाव | IFSC Code | Account No. |
|---|---|---|---|
| 1 | UCO BANK | UCBA0000289 | 02890200000001 |
| 2 | BANK OF MAHARASHTRA | MAHB0001045 | 20027601139 |
| 3 | BANK OF INDIA | BKID0000900 | 090020100002531 |
| 4 | STATE BANK OF INDIA | SBIN0000413 | 30309146380 |
| 5 | IDBI BANK | IBKL0000463 | 93010010001667 |
| 6 | AXIS BANK | UTIB0000134 | 915020055386875 |

❖ वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत जोडणे आवश्यक आहे.

❖ ज्या परीक्षांचा निकाल (Viva-Voce Exam.) नंतर जाहीर करण्यात येतील. त्या परीक्षेच्या दीक्षान्त अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे. (उदा. Ph.D/M.Phil. etc.) अशा विद्यार्थ्यांचे दीक्षान्त अर्ज ३० नोव्हेंबर, २०१६ पर्यंत रू. ८५०/- शुल्कासह स्विकारले जातील.

❖ श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांचे निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षान्त अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र श्रेणी सुधारणा झाल्याचे साक्षांकित प्रत विद्यापीठास जमा करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी अर्ज करू नयेत.

❖ अर्ज भरताना विद्यार्थ्याने आपला पूर्ण पत्ता बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चूकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार पोहोचू शकला नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.

❖ अपुऱ्या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दीक्षान्त विभाग
दि.०३-०७-२०१६

श्री. महेश काकडे
परीक्षा नियंत्रक